**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १.</u>**

**<u>मी शपथेवर कथन करतो की,</u>**

**नाव** – दिपक सुभाना किल्लेदार.

**वय** – ३९ वर्ष, **हुद्दा** – पो. हवालदार २२५२,

**नेमणूक**– उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

**<u>सरतपास- श्री. एस. आय. सावंत, सरकारी वकील.</u>**

**१.** मी दि.२६.१०.२०२४ रोजी आजरा पोलिस ठाण्यात कार्यरत असताना स. पो. नि. यमगर साहेबांना गुप्त बातमीदाराकडून आरोपी पेरणोली गावी एक इसम बेकायदेशीर दारुची विक्री करत असल्याची माहिती मिळाली होती. त्यामुळे त्यांनी आम्हाला कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्याप्रमाणे पो. ना. यलकर यांनी दोन इसमांना बोलावून पंच म्हणून येण्याची विनंती केली होती. त्यानंतर मी, पो. ना. यलकर, पंच व इतर कर्मचारी खाजगी वाहनाने पेरणोली गावी गेलो होतो.

२. आम्ही तेथे जाऊन मिळालेल्या माहिती प्रमाणे पेरणोली- वझरे रस्त्यावरील *बांबर* नावाच्या शेताजवळ निगरानी केली असता, आम्हाला एक इसम त्याच्या हातात हिरव्या पांढ-या रंगाची कापडी पिशवी घेऊन संशयितरित्या येताना दिसून आला होता. त्यामुळे आम्ही पंचां समक्ष त्याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे नावाची विचारणा केली असता, त्याने त्याचे नाव अमर भिमराव दळवी असे सांगितले होते. आम्हाला त्याच्या नावाची खात्री झाल्यानंतर आम्ही त्याच्या ताब्यातील पिशवीची पंचांसमक्ष झडती घेतली असता, त्यामध्ये देशी दारु व्हाईट डॉक्टरच्या १८० मिलीच्या २० सिलबंद बाटल्या मिळून आल्या होत्या.

३. सदर बाटल्या पो. ना. यलकर यांनी पंचांसमक्ष जप्त करुन त्यातील एक बाटली रासायनिक तपासणीकामी सिललाख मोहोर करुन वेगळी केली होती. त्याबाबतच्या पंचनाम्यावर पो. ना. यलकर, पंच व आरोपीने स्वाक्ष-या केल्या होत्या. त्यानंतर आम्ही आरोपीला जप्त मुद्देमालासह ताब्यात घेऊन पोलिस ठाण्यात आलो होतो. मी आरोपीच्या विरोधात तक्रार दिली होती. आता मला ती तक्रार दाखवली, त्यातील मजकूर बरोबर आहे. तिला **नि. क्र. पी- ८** देण्यात येतो. आरोपी आज न्यायालयात हजर नाही.

**सरतपास पुर्ण.**

नि. क्र.४ खाली.

**<u>उलटतपास – श्री. बी. एस. जाधव वकील.</u>**

**४.** आम्हाला साहेबांनी साधारणतः ११.०० वाजेच्या दरम्यान माहिती दिली होती. आम्ही ११.२० वाजता मिळालेल्या माहिती प्रमाणे कारवाई करण्यासाठी निघालो होतो. पो. ना. यलकर यांनी पेरणोली गावातील पंचांना बोलावले होते. मला त्यांनी त्या पंचांना कसे बोलावले होते याची माहिती नाही. आम्ही आमच्या खाजगी दुचाकीने कारवाई करण्यासाठी गेलो होतो. आम्ही कारवाई केलेल्या जागेचा ७/१२ उतारा पाहिला नव्हता. मला आम्ही कारवाई केलेल्या जागेच्या चतुःसिमा सांगता येणार नाहीत.

**५.** हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्या प्रमाणे आरोपी वरती कारवाई करण्यासाठी कोठेही गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही पोलिस ठाण्यात बसून खोटी केस व खोटा पंचनामा केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या ताब्यातून मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे मुद्देमाल जप्त केलेला नाही.

**उलट तपास पुर्ण.** **श्रवणोत्तर स्वीकृती,**

**फेरतपास नाही.**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – १०.०३.२०२६. (आर. पी. थोरे)

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.